| MHSO200013342025 | **नियमित दिवाणी दावा क्र. २६२/२०२५** |
|---|---|

## निशाण क्र. १२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात प्रतिवादीचे कथन असे आहे की, सदरील प्रतिवादी हे वयस्कर व आजारी असल्यामुळे दवाखान्यात औषधोपचार घेत असल्यामूळे व त्यांची आर्थिक परीस्थीती हालाखीची असल्याने त्यांना कागदपत्रे घेऊन वेळेत प्रस्तुतकामी म्हणणे देता आले नाही. सदर म्हणणे व कैफीयत दाखल करण्यास सुमारे ०३ महिने ०८ दिवसांचा विलंब झालेला असून सदरचा विलंब त्यांनी जाणूनबुजून केलेला नाही. सदर दाव्याचे काम गुणदोषावर चालण्यासाठी व नैसर्गिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे व कैफीयत देण्यास झालेला विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अन्यथा प्रतिवादी यांचे कायदेशीर हक्कावर गदा येऊन त्यांना त्यांचे हक्कापासून वंचित रहावे लागणार आहे व प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांना म्हणणे व कैफीयत देण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, सदर अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा असून सदर अर्जातील नमूद कारण हे पूर्णपणे खोटे असून त्याबाबत कसलाही कागदोपत्री पुरावा जोडलेला नाही. प्रतिवादी यांनी जाणूनबुजून त्यांचे म्हणणे व कैफीयत देण्यास टाळाटाळ केली असल्याचे दिसून येते. त्यामूळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**४.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी ते वयस्कर व आजारी असल्यामुळे दवाखान्यात औषधोपचार घेत असल्यामूळे व त्यांची आर्थिक परीस्थीती हालाखीची असल्याने त्यांना कागदपत्रे घेऊन वेळेत प्रस्तुतकामी म्हणणे देता आले नाही असे कारण नमूद केले आहे. सदर कथनाच्या पृष्ट्यार्थ त्यांनी नि.क्र. १३ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या अर्जात नमूद असलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी त्यास दाव्यास कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे हे न्यायाचे ठरेल. जर प्रतिवादी यांना झालेला विलंब माफ करुन त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू प्रतिवादी यांनी मुदतीत कैफीयत दाखल न केल्यामुळे वादी यांना विनाकाराण विलंब व मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे, सदरची बाब प्रतिवादी यांच्यावर खर्चाचे आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी यांनी रक्कम रुपये ३००/– (रुपये तिनशे फक्त) वादी यांना खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी उपरोक्त नमूद अटीची पुर्तता केल्यानंतर त्यांची कैफीयत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2025.10.31 17:16:16 +0530

दिनांक – ३१/१०/२०२५.

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ३१/१०/२०२५ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ३१/१०/२०२५ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | ०१/११/२०२५ |